CMYK

# दैनिक आरंभ मराठी

■ दैनिक ■ धाराशिव ■ अंक 219 ■ वर्ष 2 रे ■ रविवार,दि. 19 ऑक्टोबर 2025 ■ RNI NO -2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रु 5

# बॉयलर पेटले, भाव जाहीर होईनात: गेल्यावर्षी भाव न देणाऱ्यांना डच्चू

## यंदा जिल्ह्यात मुबलक प्रमाणात ऊस, शेतकऱ्यांचे भावाकडे लक्ष

सज्जन यादव | धाराशिव

धाराशिव –धाराशिव जिल्ह्यातील ऊस गळीत हंगामाला पुढील महिन्यापासून सुरुवात होत असून यासाठी बॉयलरही पेटवण्याचे कार्यक्रम सुरू झाले आहेत. मागील वर्षी मुबलक पाऊस झाल्यामुळे मागील धाराशिव जिल्ह्यात विक्रमी ऊस लागवड झाली. गाळप हंगाम अगदी काही दिवसांवर आला असला तरी कारखानदार मात्र, ऊस दर जाहीर करत नसल्यामुळे ऊस उत्पादक शेतकरी संभ्रमात आहेत. त्यातच गुळ पावडर कारखान्याचे यावर्षीही साखर कारखान्यासमोर आव्हान असणार आहे.

दिवाळी जवळ आली की साखर कारखान्याचा गाळप हंगाम सुरू करण्याची तयारी केली जाते. सध्या धाराशिव जिल्ह्यात देखील कारखान्याचे बॉयलर पेटवण्याचे कार्यक्रम सुरू झाले आहेत. राज्य सरकारने नोव्हेंबर पासून गाळप हंगाम सुरू करण्यास परवानगी दिलेली आहे. परंतु, यावर्षीही ऊस दराचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. कारखाना सुरू करण्याची वेळ जवळ आली तरीही अजून कारखानदारांनी दर जाहीर केलेला नाही. त्यातच जिल्ह्यातील गुळ पावडर कारखान्यांनी यावर्षी प्रतिटन २४०० रुपये दर जाहीर केल्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांची चिंता वाढली.

धाराशिव जिल्ह्यात जवळपास खासगी आणि सहकारी मिळून १२ साखर कारखाने आहेत. दरवर्षी नोव्हेंबर महिन्याच्या दरम्यान, कारखान्यांचा हंगाम सुरू होतो. धाराशिव जिल्ह्यात गेल्या काही वर्षांत उसाच्या क्षेत्रात वाढ झाली आहे. तरीही कारखानदार बाहेरील जिल्ह्यातील ऊस आणतात. पूर्वी मे महिन्यापर्यंत कारखाने चालायचे. पण, कारखान्यांची संख्या आणि गाळप क्षमता वाढल्याने मार्च महिन्यापर्यंत हंगाम बऱ्यापैकी संपलेला असतो. त्यातच दरवर्षी ऊस दरावरून संघर्ष उफाळून येतो. यंदाही तशीच स्थिती निर्माण झालेली आहे. जिल्ह्यातील जवळपाससर्वचसाखरकारखान्यांचे



### ऊसाच्या क्षेत्रात मोठी वाढ

मागील वर्षी धाराशिव जिल्ह्यात मुबलक पाऊस पडल्यामुळे उसाचे क्षेत्र वाढले आहे. मागील वर्षी जिल्ह्यात जवळपास ७५ हजार हेक्टर क्षेत्रावर उसाची लागवड करण्यात आलेली आहे. यावर्षी मे महिन्यापासूनच पाऊस सुरू झाल्यामुळे यंदा उसाची वाढ चांगली झालेली आहे. त्यामुळे उसाचे एकरी उत्पादन देखील चांगले होईल असा अंदाज आहे.

बॉयलर पेटले आहेत. परंतु, मांजरा वगळता एकाही कारखान्याने दराबाबत कुठलेच भाष्य केलेले नाही. मांजरा परिवाराने यंदा प्रतिटन ३१५० पेक्षा अधिक दर देण्याची घोषणा केल्यामुळे इतर कारखान्यांची चिंता वाढली आहे. मांजरा ने जाहीर केलेल्या दराबद्दल शेतकऱ्यांमध्ये समाधान असले तरी सर्वच कारखाने इतका दर देणार नाहीत. त्यामुळे साखर कारखान्यांनी सुरुवातीलाच दर जाहीर करावेत अशी मागणी ऊस उत्पादक शेतकरी करत आहेत. एक नोव्हेंबरनंतर केव्हाही साखर कारखान्यांचा हंगाम सुरु होणार असल्यामुळे ऊसाच्या दराकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.



### कारखान्यांना ३२०० ते ३४०० दर देण्यास अडचण नाही

सध्या साखरेला मिळत असणारा भाव, इथेनॉलची मोठी मागणी तसेच इतर उपपदार्थाला मिळणारे भाव याचा विचार करता साखर कारखान्यांना यावर्षी ३२०० ते ३४०० रुपये प्रतिटन दर देण्यास अडचण नाही. केंद्र शासनाने सव्वा दहा बेस रिकव्हरीला ३ हजार ५५० रुपये एफआरपी जाहीर केलेली आहे. त्यामुळे यंदा जास्तीच्या दराची शेतकऱ्यांना अपेक्षा आहे.

### गूळ पावडर कारखान्यांनी जाहीर केला २४०० रुपये दर

धाराशिव जिल्ह्यात मागील दोन वर्षांपासून गूळ पावडर कारखान्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. सध्या जिल्ह्यात ११ गूळ पावडर कारखाने आहेत. मागील वर्षी जिल्ह्यातील एकूण ऊसापैकी २५ टक्के उसाचे गाळप गूळ पावडर कारखान्यांनी केले होते. मागील दोन वर्षात या गूळ पावडर कारखान्यांनी दरही चांगला दिल्यामुळे साखर कारखान्यांना ऊस मिळवणे कठीण गेले. यंदा मात्र गूळ पावडर कारखान्यांनी प्रतिटन केवळ २४०० रुपये दर जाहीर केल्यामुळे शेतकरी नाराज झाले आहेत. या दरामध्ये आणखी १०० रुपये वाढ करून २५०० रुपये प्रतिटन अंतिम दर जाहीर करण्याची भूमिका गूळ पावडर संघटनेने घेतली आहे. परंतु, साखर कारखान्याच्या तुलनेत हे भाव ५०० ते ७०० रुपयांची कमीच असतील.

## ऑटो रिक्षा चालक-मालक संघटनेच्या वतीने पूरग्रस्तांसाठी मुख्यमंत्री सहायता निधीला मदत




आरंभ मराठी | धाराशिव

महाराष्ट्रामध्ये गेल्या महिनाभरात अतिवृष्टीने महापुराची परिस्थिती निर्माण झाली होती. अनेक गावांमध्ये व शेतीच्या पिकांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी शिरल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतीचे व जनावरांचे प्रचंड मोठे नुकसान झालेले आहे. शेतीमधील संपूर्ण माती वाहून गेलेली आहे तर काही ठिकाणी अनेक जनावरे देखील मृत्युमुखी पडलेली आहेत. शेतकऱ्यांवर अस्मानी संकट कोसळलेले आहे. शेतकऱ्यांना धीर देण्यासाठी व काही प्रमाणात आर्थिक मदत व्हावी या उद्देशाने धाराशिव येथील शिवराज्याभिषेक रिक्षा समिती धाराशिव व इतर सर्व ऑटो रिक्षा चालक–मालक बांधवांनी आपल्या अल्प उत्पन्नातील काही हिस्सा पूरग्रस्त बाधीत शेतकऱ्यांना देण्याच्या उद्देशाने सर्वांनी एकत्र येऊन काही विशिष्ट रक्कम जमा केली. या सर्वांच्या स्वकष्टाच्या निर्मित उत्पन्नातील काही भाग एकत्र करून तो मुख्यमंत्री सहाय्यता निधीला देण्यात आला.ऑटो रिक्षा चालक–मालक यांनी जमा केलेला निधी निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव यांच्याकडे चेक द्वारे मुख्यमंत्री सहाय्यता निधीला जमा करण्यात आला. यावेळी शिवराज्याभिषेक रिक्षा समितीचे अध्यक्ष व्यंकटेश पडीले, उपाध्यक्ष तुशाल सूर्यवंशी, सचिव कलीम शेख, कार्याध्यक्ष योगेश आतकरे, जालिंदर राऊत, रामेश्वर स्वामी, विजय इटकरे इत्यादी पदाधिकारी व ऑटो रिक्षा चालक मालक उपस्थित होते.

## कुंथलगिरी येथील जैन मंदिरात चोरी; दानपेटीतून १२ लाखांचा ऐवज लंपास

आरंभ मराठी | वाशी

कुंथलगिरी येथील जैन मंदिरात धाडसी चोरी करण्यात आली चोरट्यांनी दानपेटीतील तब्बल १२ लाखांचा ऐवज लंपास केला आहे. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की, दिनांक १६ ऑक्टोबर ते १७ ऑक्टोबर दरम्यान कुंथलगिरी जैन मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वाराचा कडी–कोंडा अज्ञात चोरट्यांनी तोडून आत प्रवेश केला. चोरट्यांनी मंदिरातील दानपेटीत असलेली सुमारे ९ ते १२ लाख रुपये रोख रक्कम तसेच देवदेवतांच्या पितळी मूर्ती असा एकूण ९ लाख ते १२ लाख १० हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरून नेला. या प्रकरणी उमंग रविंद्र शहा (वय ४५ वर्षे, रा. कुंथलगिरी, ता. भूम, जि. धाराशिव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वाशी पोलीस ठाण्यात भा.दं. वि. कलम ३३१(४), ३०५(डी) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास वाशी पोलिसांकडून सुरू आहे.

## मुक्ताई उद्योग समूहाचा दहा गावातील शेतकऱ्यांसाठी मदतीचा हात





आरंभ मराठी | भूम

भूम तालुक्यातील बाळासाहेब खरवडे यांच्या वतीने मुक्ताई उद्योग समूह पुणे यांच्या माध्यमातून अतिवृष्टी झालेल्या भागातील दहा गावांना दिवाळी साहित्याची किट व प्रत्येक कुटुंबाला पाच किलो साखरेचे वाटप केल्याने शेतकऱ्यांची दिवाळी गोड झाली आहे. ईट परिसरातील अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या दहा गावांमध्ये दिवाळीचे फराळ असलेले साहित्य किट व प्रत्येक कुटुंबाला प्रत्येकी पाच किलो साखर देऊन आर्थिक संकटामध्ये असलेल्या शेतकऱ्यांना साथ देण्याचे काम डोकेवाडी येथील युवा उद्योजक बाळासाहेब खरवडे यांनी मुक्ताई उद्योग समूहाच्या माध्यमातून हा उपक्रम राबवला. यावेळी झेंडेवाडी, पांढरेवाडी, डोकेवाडी, गिरवली, सोनेवाडी, माळेवाडी, निपाणी, आदरुड, अंजनसोंडा, ईट गावातील नागरिकांची दिवाळी गोड केली. पांढरेवाडी व झेंडेवाडी येथे झालेल्या दिवाळी साहित्य किट वाटपा प्रसंगी मुक्ताई उद्योग समूहाचे अध्यक्ष बाळासाहेब खरवडे त्याचबरोबर मधुकर मोटे, रवींद्र पवार, शिवाजी जालन, दासराव हुंबे उपस्थित होते. यावेळी मिळालेल्या साहित्याबद्दल उपस्थित नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

## दंडनाईक परिवाराने शेकडो कुटुंबाची दिवाळी केली गोड; किराणा वाटप





आरंभ मराठी | धाराशिव

शहरातील यशवंत नगर परिसरात दंडनाईक परिवाराच्यावतीने सामाजिक बांधिलकी जपत शेकडो गरजू महिलांना आणि कुटुंबियांना दिवाळीनिमित्त किराणा साहित्य वाटप करण्यात आले. या उपक्रमात पृथ्वीराज दंडनाईक, रोहितराज दंडनाईक आणि संपूर्ण दंडनाईक परिवाराने सहभाग घेत, गरजूंच्या चेहऱ्यावर आनंद फुलवला.या दिवाळीत थोडा प्रकाश, थोडं प्रेम आणि थोडं आत्मियतेचं ऊब देण्याचा प्रयत्न आम्ही केला,असे दंडनाईक परिवाराने सांगितले.दिवाळीच्या या सणात मायेचा आणि आपुलकीचा झरा वाहवणाऱ्या या उपक्रमामुळे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.

## भूम तालुक्यात चौदा वर्षीय अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

**भूम** :–भूम तालुक्यातील एका गावात एका चौदा वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. लैंगिक अत्याचार करून आरोपीने मुलीला व तिच्या आईला जीवे मारण्याची धमकी दिली. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की,भूम तालुक्यातील एका गावातील १४ वर्ष ८ महिन्याची मुलगी (नाव– गावगोपनीय) ही दिनांक १७ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी एक वाजता आईसह घरी बसली होती. त्यावेळी गावातील पाच तरुणांनी गैरकायद्याची मंडळी जमवून तिच्या आईस शिवीगाळ करुन घरात कोंडले व बाहेरुन कडी लावली. त्यातील एका तरुणाने मुलीला शेतात नेवून तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. इतर तरुणांनी शिवीगाळ करुन तू झालेल्या प्रकाराची कोठे वाच्यता केल्यास तुला व तुझ्या आईला जिवे ठार मारीन अशी धमकी दिली. पीडित तरुणीच्या आईने दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या.सं. कलम– ६४ (१), १२५, १८९(२), १९१(२), १९३(३), १९०, ३५२, ३५१(३) सह पोक्सो अधिनियम ४, ८, १२ सह ९२ (ड) अपंग व्यक्ती अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवला आहे.पुढील तपास पोलीस करत आहेत.

आरंभ मराठी

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीस ५१,००० रुपयांचा निधी सुपूर्द

# अतिवृष्टीग्रस्तांना परंडा विधिज्ञ मंडळाची भरीव मदत




आरंभ मराठी | परंडा

परंडा तालुक्यातील अतिवृष्टीग्रस्त नागरिकांना मदतीचा हात देत परंडा विधीज्ञ मंडळातर्फे मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी रुपये ५१,०००/– एवढ्या निधीचा डिमांड ड्राफ्ट जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्याकडे सुपूर्त करण्यात आला. सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे परंडा तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांचे, शेतमजुरांचे व सर्वसामान्य नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. या पार्श्वभूमीवर सामाजिक बांधिलकी जपत विधीज्ञ मंडळ परंडा यांनी एकत्र येऊन मदतीचा निधी जमा करून समाजाप्रती आपली जबाबदारी निभावली आहे. या वेळी विधीज्ञ मंडळ परंडाचे अध्यक्ष ॲड. सतीश माने, ॲड संतोष सुर्यवंशी , ॲड विवेक काळे, ॲड दादासाहेब खरसडे , ॲड सुजित देवकते, ॲड संदीप पाटील, ॲड गोविंद कोठुळे आदी पदाधिकारी उपस्थित होते. त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात भेट देऊन सदर डिमांड ड्राफ्ट प्रत्यक्ष जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांना दिला. या उपक्रमामुळे विधीज्ञ मंडळाने सामाजिक संवेदनशीलतेचे आणि जबाबदारीचे उत्तम उदाहरण घालून दिले असून, अतिवृष्टीग्रस्तांसाठी हे योगदान प्रेरणादायी ठरले आहे.

## नाम फाउंडेशनचा मदतीचा हात; अतिवृष्टीग्रस्तांना किराणा किटचे वाटप




आरंभ मराठी | शिराढोण

अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकरी व शेतमजूरांच्या मदतीसाठी नाम फाउंडेशनच्या वतीने वाठवडा (ता. कळंब) येथे किराणा किटचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम नाम फाउंडेशनचे लातूर, धाराशिव व बीड जिल्ह्यांचे समन्वयक डॉ. हर्षवर्धन राऊत पाटील यांच्या माध्यमातून पार पडला. कार्यक्रमात शिराढोण पोलीस स्टेशनचे ए.पी.आय धरणीधर कोळेकर यांच्या हस्ते पूरग्रस्तांना किराणा किटचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी डॉ. हर्षवर्धन राऊत पाटील, वैभव पाटील, गणेश भारती, तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष दिलीप राऊत, जनक पुंड, सरपंच बालाजी अल्टो, चरणदास राऊत, प्रभाकर पुंड, सोमनाथ टिंगरे आदी मान्यवर उपस्थित होते. वाठवडा येथे ६० तर संपूर्ण कळंब तालुक्यात एकूण ६०० किटचे वितरण करण्यात आले. तांदूळ, ज्वारी, साखर, चहापत्ती, गव्हाचा आटा, मसाला, मिरची, जीरे आदी आवश्यक किराणा साहित्य असलेली ही किट्स वाठवडा, पाडोळी, निपाणी, ढोराळा, ढोकी, मंगरूळ, रत्नापूर या गावांतील पूरग्रस्तांना वाटण्यात आली. या उपक्रमाबाबत बोलताना ए.पी.आय धरणीधर कोळेकर म्हणाले, नाम फाउंडेशनच्या या उपक्रमातून आम्हालाही प्रेरणा मिळाली असून प्रत्येकाने अतिवृष्टीने बाधित झालेल्या शेतकऱ्यांसाठी मदतीचा हात पुढे करणे आवश्यक आहे.

CMYK

CMYK 02
दैनिक आरंभ मराठी
www.arambhmarathi.com
संपादकीय
रविवार,दि. 19 ऑक्टोबर 2025

# फटाकेमुक्त दिवाळीचा संकल्प वास्तवात कधी येणार ?

**लाखो** वर्षांच्या उत्क्रांतीनंतरही आपल्या जीन्समध्ये असणाऱ्या विध्वंसक प्रवृत्ती विविध रूपात प्रकट होत असतात. या प्रवृत्तीला प्रकट करण्यासाठी अनेक परंपराही आपण लोकजीवनात तयार केल्या आहेत. त्यापैकीच एक म्हणजे दिवाळी सणात फटाके उडवण्याची परंपरा. साधं सोशल मीडियाचं उदाहरण घ्या. लोक आपल्या भावना आणि विचार ज्या पद्धतीने व्यक्त करतात, त्यातून अनेकदा त्यांच्या आत दडलेल्या विध्वंसक प्रवृत्तीचे दर्शन घडते. दुसऱ्याच्या वॉलवर द्वेषपूर्ण मजकूर लिहिणे, शिवीगाळ करणे, अश्लील भाषेचा वापर करणे किंवा हिंसेला उत्तेजन देणारे पोस्ट टाकणे याला काय म्हणावे? आजच्या भाषेत त्यांना ''ट्रोल'' म्हणतात. आपल्या भाषेत यासाठी एक अचूक शब्द आहे टोळधाड. टोळधाड म्हणजे काय? टोळ झुंडीने येतात आणि संपूर्ण शेताची वाट लावतात, पिक नष्ट करतात. तशीच ही ट्रोल टोळी दुसऱ्याची सर्जनशीलता नष्ट करते हेही एक प्रकारचं विध्वंसच नाही का? दुसऱ्याच्या भावना दुखावण्यासाठी, अपमानित करण्यासाठी, कुणाला कमी लेखण्यासाठी किंवा स्वतःची ताकद



दाखवण्यासाठी हिंसक व्हिडिओ वा रील्स बनवून सोशल मीडियावर टाकणे हीसुद्धा विध्वंसक प्रवृत्तीच आहे.२५ वर्षांपूर्वी सोशल मीडिया नव्हता, तेव्हाही लोक सार्वजनिक शौचालयांच्या भिंतींवर, रेल्वेगाड्यांवर, ऐतिहासिक वास्तूंवर अश्लील वा अपमानजनक गोष्टी लिहायचे. हीदेखील विध्वंसक प्रवृत्तीचीच अभिव्यक्ती होती. लहान मुलं भिंतींवर काहीतरी खरडतात, पण त्यात निरागसता असते. जसजसं त्यांचं सामाजिक भान वाढतं, तसतसं ते समाजातील वाईट प्रवृत्ती पाहून स्वतःत बदल घडवतात. सुप्त अवस्थेत असणाऱ्या विध्वंसक प्रवृत्तीला व्यक्त होण्यासाठी पुढे विविध मार्ग मिळतात त्यापैकी सोशल मीडिया हा एक आहे. आपल्यासोबत जे वाईट घडतं त्याची कारणमीमांसा न करता, समोर दिसणाऱ्यावर राग व्यक्त करणे, सोशल मीडियावर ट्रोल करणे, निरपराध व्यक्तीला मारहाण करणे हे सगळे प्रकार त्या रागाच्या आणि विध्वंसक ऊर्जेच्या अनियंत्रित अभिव्यक्तीचे उदाहरण आहेत. पूर्वीही अशीच प्रवृत्ती अन्यायकारक होती, आणि आजही आहे.जे विषय समजून घेण्याचा प्रयत्न करत नाहीत, तर्क आणि विचारांची लढाई न लढता हातपाय चालवतात, तेच माणसातील जंगलीपण जिवंत ठेवतात. दुसऱ्याचे चांगले विचार, लोकोपयोगी काम, किंवा एखाद्या जनसेवकाचे योगदान नष्ट करण्याचा प्रयत्न करणे हेही विध्वंसकच. सार्वजनिक साधनसामग्रीची मोडतोड करून आपली ''ताकद'' दाखवणे हीसुद्धा विध्वंसक प्रवृत्ती.'' विचारांची लढाई विचारांनी लढली पाहिजे!'' हा पुरोगामी सुसंस्कृत विचार न अंगीकारता मारझोड करून, दहशत बसवून, विरोधकांचा आवाज दाबून आपली विध्वंसक वृत्ती असभ्यपणे प्रकट केली जाते.व्यवस्थेला प्रश्न विचारणाऱ्यांचं तोंड बंद करण्यासाठी विध्वंसक वृत्तीच्या लोकांचा वापर अनादी काळापासून होत आला आहे. दिवाळी सणात कदाचित याच ''विध्वंसक प्रवृत्तीच्या शमनासाठी'' फटाके फोडण्याची परंपरा तयार झाली असावी. राग शांत करण्यासाठी ''दहा पर्यंत उलट मोजा'', ''दीर्घ श्वास घ्या'' असे उपाय सांगितले जातात. त्याचप्रमाणे, राग किंवा आंतरिक आक्रोश व्यक्त करण्यासाठी फटाके फोडण्याची कल्पना कुठल्यातरी काळात उद्भवली असावी.काही जण म्हणतात की, ''फटाके फोडून आनंद व्यक्त केला जातो.'' पण प्रश्न असा आहे ध्वनी प्रदूषण, वायू प्रदूषण, आणि परिसर अस्वच्छ करून आनंद व्यक्त करणे योग्य आहे का? अनेक ठिकाणी अंत्ययात्रेतही फटाके फोडले जातात. मग ते आनंद व्यक्त करण्यासाठी असतात का? की दुःख, राग आणि चीड व्यक्त करण्यासाठी? आपला प्रिय व्यक्ती नियतीने हिरावून नेल्याची असहाय भावना व्यक्त करण्यासाठीच कदाचित ही परंपरा निर्माण झाली असेल.

मागील महिन्यात महाराष्ट्रातील दुष्काळी भागात प्रचंड पाऊस पडून नद्यांना महापूर आला. पर्यावरण तज्ञ सांगतात की हा हवामान बदलाचा परिणाम आहे.औद्योगीकरण, वाहनांचा वाढता वापर या कारणांवर आपण लगेच नियंत्रण मिळवू शकत नाही; पण फटाके उडवून होणारे प्रदूषण कमी करून हवामान बदलास थोडी तरी मदत करू शकतो. दरवर्षी आपण ''फटाकेमुक्त दिवाळी''चा संकल्प करतो, पण तो केवळ घोषणांपुरता राहतो. आता वेळ आली आहे आपल्या विध्वंसक प्रवृत्तीच्या शमनासाठी फटाक्यांची नव्हे, तर सजगतेची, संयमाची आणि पर्यावरणपूरक विचारांची दिवाळी साजरी करण्याची. दिवाळीचा प्रकाश केवळ घरांना नव्हे, तर मनांनाही उजळवणारा असावा विध्वंस नव्हे, संवेदनशीलतेचा उत्सव साजरा करण्याचा संकल्प करूया.''



**किशोर जाधव**
सोलापूर
मो. ९९२२८८२५४१

# दिपावलीच्या शुभेच्छा देताना..

**मित्रांनो,** दिपावली हा सण भारतीय संस्कृतीमध्ये सर्वात मोठा आनंदाचा, सन्मानाचा,सुखसोळ्याचा, लेकी बाळी माहेरी येण्याचा,अंगणात, घरात नातवंड खेळण्याचा पाहुणे,रावळ्यांच्या, मित्रांच्या भेटीचा,सुख वाटण्याचा सुद्धा म्हनायला हरकत नाही..

पण हा सण दुःख वाटून घेण्याचा साजरा करायला लागलो तर???

पण जगामध्ये दुःख वाटून घेण्याचा एकही सण अस्तित्वात असल्याचे मला तरी माहितीत, अभ्यासात नाही आपण आज थोडासा चिंतनाचा भाग म्हणून, धनत्रयोदशी या दिवसाच्या निमित्ताने थोडसं चिंतन करण्याचा प्रयत्न करणार आहोत.

मी गेली पाच सहा वर्षांपासून कुठल्याच सणाच्या शुभेच्छा मित्रांना देत नाही.देण्याचा प्रयत्न करत नाही. जे जे मित्र शुभेच्छा देतील त्यांना मात्र नमस्कार करतो.वंदन करतो. आभार मानतो....

आज अनेक मित्रांनी धनत्रयोदशीच्या शुभेच्छा दिल्या.त्या अशा,एक सोन्याचा हंडा आहे.वरती सोन्याची नाणी आहेत. असं सुख समाधान आपणास मिळावं म्हणून चित्राच्या माध्यमातून शुभेच्छा दिल्या.

खरंच ह्या शुभेच्छांनी मित्राला सुख, सोनं,नाणं मिळणार आहे का?तर नक्की नाही...

औपचारिकता म्हणून आपण शुभेच्छा दे असतो.त्यानिमित्ताने आपण मित्रांची आठवण करत असतो.पूर्वी प्रत्यक्षात भेटायचो. त्यानंतर पोस्ट कार्ड लिहायला लागलो.त्यानंतर आताच्या काळात फोन द्वारे शुभेच्छा द्यायला लागलो. काळ बदलत जाईल तसतशी शुभेच्छा देण्याची सुद्धा परंपरा बदलत गेली. ती एक नाते वृद्धिगत करण्याची परंपरा आहे.यापलीकडे दुसरं नाही..

आत्ता माझी हा छोटासा लेख लिहिताना काय भावना आहे,ती आपण समजून घ्यावी. ही नम्र विनंती.

भारतीय संस्कृतीमधील सर्व सण एकमेकांच्या उत्साहात,आनंदात, सहभागी होण्यासाठी आहेत.हे सत्य आहे.जे चांगलं आहे.समाधानाचं आहे. दीपावली हा सण भारतामध्ये सर्वात मोठा आनंदाचा सण मानला जातो.

या सणाच्या निमित्ताने शुभेच्छा देत असताना आपण मोठ्या घरात आहोत.श्रीमंत आहोत.दानशूर आहोत. असे गृहीत धरल्यास आजूबाजूला कोणी झोपडीत राहतो काय?उपाशी तापाशी आहे काय? कोणी आजारी आहे काय? कोणी दुःखात आहे काय?त्याला पोटभर अन्न पाण्याची आवश्यकता आहे काय?ती आवश्यकता एक दिवसापूर्ती, एका वेळच्या जेवणापूर्ती आपण पूर्ण करू शकतो का? ही भावना प्रत्येक माणसाच्या मनात आली तर किमान या सणाच्या दिवशी पूर्ण देश नाही तर जगभरातली माणसं किमान पोटभर जेवण करून आनंदात राहतील.....

असं आपण करतोच असे नाही. जे करतात त्यांना पाठिंबाही देत नाहीत. त्यांच्यासोबत ही जात नाही.आणि जर असे उपक्रम या जगातले दानशूर प्रेमळ लोक करत असतील त्या सर्व भावंडाना नतमस्तकचं व्हयला पाहिजे. त्यांच्यातच देव पहिला पाहिजे.

फक्त वांझोट्या शुभेच्छा देऊन श्रीमंतीचा अव आणण्यात अर्थ नाही असे वाटते. दुसऱ्यांचे दुःख, दुसऱ्यांच्या भावना, आपण जाणून घेत नसू,तर आज पासून शुभेच्छा द्यायच्या सुद्धा बंद करायला काहीच हरकत...

मग प्रत्येकाने काय करावं?

आजूबाजूला कोणी उपाशी आहे काय?कोणाची सण करण्याची ऐपत नाही काय? कोण दुबळा आहे काय?कोण विकलांग आहे काय? कोण आर्थिक दृष्ट्या गरीब आहे काय?अशा माणसांच्या थेट घरी जा... एक ओंजळ गोडधोड घेऊन जा.जे आपल्या घरात तयार असेल ते ते घेऊन जा.त्यांच्या शेजारी बसा. त्यांना दोन घास खाऊ घाला. नमस्कार करा.आणि निघून जा. मला वाटतं हा उपक्रम दानशूर लोकांनी,श्रीमंत लोकांनी,दायित्वाची भावना असणाऱ्यांनी साजरा करायलाच पाहिजे...

ते करत राहिलो तर भारतीय संस्कृती मधल्या दायित्वाची भावना वृंधीगत होईल.आणि देशांमध्ये ज्या धर्म आणि संस्कृतीने आम्हाला दायित्वाची भावना शिकवली त्याचं सोनं होईल.

नेमकं आपण चुकत राहिलो... ज्यांना गरज नाही, त्यांच्या दानपेट्या भरत राहिलो.सोन्याचे गाभारे भरत राहिलो. हातात आपल्या काहीच आलं नाही. श्रीमंत मात्र ते झाले. दुबळे आपण होत गेलो.

दान पेटीत दान दिल्याने ना देवाने स्माईल दिलं.ना पुजाऱ्यांनी स्माईल दिलं.कोणाचही स्माईल मिळालं नाही. मिळणारही नाही.कारण तुमच्यासारखे दोन चार रुपये टाकुण देवाला भीक घालणारे,देवाला भीक मागणारे,दानधर्म केल्याचे समाधान मानणारे, लाखो त्यांच्यासमोर ओळ करून उभे रहात असतात.

म्हणून म्हणतो जिवंत असणाऱ्या कुठल्याही प्राणी,पक्षी,माणसं यांच्यात देव शोधा.महावृक्षांच्या मध्ये देव शोधा,चालता चालता एक तांब्याभर पाणी एका झाडाला घाला. दुसऱ्या दिवशी येऊन पहा त्या झाडाला नवीन पालवी फुटलेली असेल.ते झाड, ती पालवी तुमच्याशी हसायला लागेल.बोलायला लागेल.

तथागत गौतम बुद्धांना पिंपळाच्या झाडाखाली दिव्य ज्ञान प्राप्त झालं. ते एवढं पवित्र झाड आहे.तर मग आपण असे एखादे झाड लावू शकु का.?हा विचार करायलाच लागेल. कारण हा विचार मूळ वैज्ञानिक आणि पृथ्वी संगोपनाचा धर्म शिकविते.

चला धनत्रयोदिवशी आपण दुसऱ्यांचे स्माईल मोजण्याचा प्रयत्न करू.एखादं झाड लावण्याचा प्रयत्न करू.एखाद्या गरिबांना दोन घास खाऊ घालण्याचा प्रयत्न करू.हे सहज शक्य आहे...

आमच्या भावना आपण आत्मसात करण्याचा प्रयत्न कराव्यात.करावेच असं नाही. जे लोक दुसऱ्यांना मदत करून स्माईल मोजण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्यातच खरा देव असतो. सनाच्या निमित्ताने चला तर आपणच देवाच्या प्रतिमेत दुसऱ्या गरजवंत देवांना भेटायला जाऊ...

**-भूमिपूत्र वाघ**

# मन मोठं करून दिवाळी साजरी करता येईल?

**भारतीय** संस्कृतीत दिवाळी सणाला फार महत्त्व आहे.दिवाळी सणाला लेकी बाळी माहेराला येतात.शहरात व दुसऱ्या गावात नोकरी करणारे नोकरदार आपल्या कुटुंबासह दिवाळी सणाला ऐटीत गावाकडे येतात.दिवाळी सणाला गाव भरून दिसतो आणि आकाश कंदील व दिव्यांच्या प्रकाशाने गाव उजळून निघतो.जिकडे तिकडे दिवाळीची लगबग चालू असते. एकमेकांची भेट घेऊन ख्याली खुशाली विचारली जाते. दिवाळी सणाच्या फराळाचा घमघमाट सर्वत्र दरवळतो. लहानथोर मंडळी दिवाळी सणाचा आनंद लुटतात. एकत्र येऊन फटाके फोडले जातात. लहान बालके फुलबाजे पेटवतात.आनंदाने टाळ्या वाजवतात.नवीन कपडे घालून मिरवतात.शहरातील दिवाळीला नुसता झगमगाट असतो.जिकडे तिकडे रंगीबेरंगी आकाशकंदील ठळक दिसताय. उंचच उंच इमारती विद्युत रोषणाईने नटलेल्या असतात आणि चोहीकडे फटाक्यांची आतषबाजी व नुसता धुमधडाका असतो. परंतु, या सगळ्या धावपळीत यावर्षी आपल्या शेजारच्या घरी किंवा गल्लीतील लांबच्या घरी दिवाळी सणाचा आनंद कदाचित दिसणार नाही. कारण यावर्षी पावसाने चांगलाच धूमाकूळ घातला होता.शेतातील पिकांची नासाडी झाली आहे.बऱ्याच गरीबांच्या घरात दिवाळी साजरी होणार नाही. काही शेतकरी बांधव आपल्या लेकरांना नवीन कपडे घेऊ शकणार नाहीत.महागाईमुळे दिवाळीचा फराळ बनवला जाणार नाही.अशी बिकट परिस्थिती असताना श्रीमंतांनी व नोकरदारांनी मात्र दणक्यात दिवाळी साजरी करणे मनाला पटणार नाही व संयुक्तिक ठरणार नाही.असेही चित्र पाहायला मिळते की,नोकरदार भाऊ दिवाळी सण मोठ्या उत्साहात साजरी करतात आणि गावात राहणारे शेतकरी भाऊ साध्या पद्धतीने दिवाळी साजरी करतात.माणुसकीच्या दृष्टीने हे चित्र मनाला खटकते,वेदना देणारे असते.तेव्हा आपले मन थोडं मोठं करा आणि शेजारच्या घरी,आपल्या शेतकरी भावाच्या घरी दिवाळी सण साजरा होण्यासाठी गुपचूप आर्थिक मदत करा.नोकरीच्या पगारातील किंवा बोनसमधील थोडी रक्कम भावाच्या खिशात घाला,शेजारच्या घरी फराळाचे पदार्थ ताट भरून जाऊ द्या.त्यांच्या लेकरांना नवे कपडे व छोटेमोठे फटाके घेऊन द्या.त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद तुमचा चेहरा नक्कीच उजळून टाकेल.

आपल्या गावात एकल पालकत्व असलेले अनेक मुलेमुली असतात.अनाथश्रमातील मुले मुली आईवडिलांविना जीवन जगत असतात.वृध्द आईवडिलांना गावातील जुन्या घरात ठेवून शहरात स्थायिक झालेले मुले दिवाळी सणाला सुध्दा गावाकडे येत नाहीत. आईवडिलांसोबत आनंदाने दिवाळी साजरी करत नाहीत.अशा लोकांना गरीब बहिणींची आठवण सुद्धा येत नाही.वृध्दाश्रमात उर्वरित आयुष्य कसेतरी जगणाऱ्या आईवडिलांना दिवाळीचे काहीच वाटत नाही. त्यांच्या जीवनात काळाकुट्ट अंधार पसरलेला असतो.दरवर्षीची दिवाळी त्यांच्या करिता एक कटू आठवण असते.

फुटपाथवर जीवन जगणाऱ्या बेघर लोकांना दिवाळी काय असते?हेच बहुधा माहीत नसते. अशा लोकांना दिवाळीचा सण उत्सव आनंदाने साजरा करता येत नाही.त्यांची तशी परिस्थिती नसते.अशा लोकांबरोबर आनंदाने दिवाळी साजरी करता आली पाहिजे.त्यांना दिवाळीचा फराळ पोटभर खाऊ घातला पाहिजे. जमलं तर नवीन कपडे घेऊन दिले पाहिजेत.तरच सर्वांची दिवाळी गोड होईल. सर्वांना दिवाळीचा आनंद लुटता येईल.आईवडिलांना, बहिणींना,भावाला,भाचे व पुतणे पुतणीला नवीन कपडे खरेदी करून द्या.यामुळे मिळणारा आनंद हा मन प्रसन्न करून टाकतो. मनात वर्षाचे बाराही महिने स्वार्थ लपून बसलेला असतो.दिवाळी सणाला मनात बसलेल्या त्या स्वार्थाला थोडावेळ बाजूला ठेवून, मन मोठं करून सर्वांना आनंद देणारी दिवाळी साजरी करा.हीच खरी माणुसकी आहे.



**बबन दामोदर गुळवे**
उमरगा कोर्ट ता.अहमदपूर
जि.लातूर.
मो. ९७३०९३९७३२.

# उद्याच्या राष्ट्रोत्थानाची दिशा-बालसंस्कार केंद्र

**शिवाजी महाराज** जन्माला यावेत, पण दुसऱ्याच्या घरात. अशी समाजाची मानसिकता आहे. घरारघरात शिवाजी जन्माला यावेत, ही स्वाध्याय परिवाराच्या बालसंस्कार केंद्र प्रयोगामागची भूमिका आहे. जड वस्तूंवर प्रयोग करणारे प्रयोगवीर अनेक आहेत. त्यांच्याविषयी आदरही आहेच, पण माणसावर प्रयोग करून माणूस उभा करणारे एकमेव कर्ते विचारवंत म्हणजे पांडुरंगशास्त्री आठवले, अर्थात स्वाध्यायींचे परमपूजनीय दादाजी. त्यातला सर्वांत मुलभूत प्रयोग म्हणजे बालसंस्कार केंद्र. 'आम्हीच वारस नचिकेताचे, प्रल्हादाचे, बाळ ध्रुवाचे' असे म्हणणारे सिंहाचे छावे बालसंस्कार केंद्रात घडविले जातात.

आपण आपल्या मुलांचे मालक नसतो, तर विश्वस्त असतो. खलील जिब्रान असे म्हणतो, ''तुमची मुले तुमची मुले नाहीत. जीवनाच्या स्वत:च्या अभिलाषेची ती पुत्र आणि कन्या आहेत. ती तुमच्यामार्फत येतात, परंतु तुमच्यातून नव्हे. आणि जरी ती तुमच्यासोबत असली, तरी ती तुमची नसतात.'' या वाक्याचा विचार केला तर कळते, मुले ही भगवंताने आपल्या हाती सोपवलेली अमानत आहे. ती आपण कशी सांभळतो, ते महत्त्वाचे आहे. मुलांना प्रथम मौल्यवान वस्तू द्यायच्या, की मूल्ये द्यायची? हे ठरवण्याची वेळ आलेली आहे. दिवसेंदिवस गुन्हेगारीचा आलेख कसा उंचावतो आहे, याच्या मन विषण्ण करणाऱ्या बातम्या दररोज वर्तमानपत्रातून आपण वाचीत असतो. एकवेळ तेही पचवलं असतं. पण



चोऱ्यामाऱ्या , खूनाच्या गुन्ह्यांमध्ये सर्वाधिक सहभाग अल्पवयीन मुलांचा आहे. ही धोक्याची घंटा आहे. यात दोष कोणाचा? कुटुंब, समाज की आपल्या शिक्षणव्यवस्थेचा?आपण मुलांना हवे ते देतो, पण योग्य तेच देत नाही. म्हणून योग्यता निर्माण होत नाही. ऐश्वर्यस्य विभूषणं सुजनता शौर्यस्य वाक्संयमो, ज्ञानस्योपशम: श्रुतस्य विनयो वित्तस्य पात्रो व्यय: । अक्रोधस्तपस: क्षमा प्रभवितुर्धर्मस्य निर्व्याजता, सर्वेषामपि सर्वकारणमिदं शीलं परं भूषणम् ।। ऐश्वर्याचं भूषण सज्जनपणा, शौर्याचं भूषण वाणीवरचा संयम, शांती हे ज्ञानाचं भूषण, विद्वत्तेचं भूषण विनय, संपत्तीचं भूषण सत्पात्री दान, तपाचं भूषण क्रोधरहितता, क्षमा समर्थांचं भूषण आणि या सर्व अलंकारांसाठीचा सर्वश्रेष्ठ दागिना म्हणजे विमल चारित्र्य. तेच निर्माण करण्याचा प्रयत्न स्वाध्याय करतो.कोवळ्या रोपट्याला जसे वळवावे तसे ते वळते. चार-पाच वर्षांच्या बालकापासून सोळा-सतरा वर्षांच्या किशोरांना जमवून या प्रयोगाची सुरुवात १९५४ साली झाली. पहिल्या वर्षी बोटावर मोजता येईल एवढीच संख्या होती. आज मात्र बालसंस्कार केंद्रातील बालकांची संख्या हजारोंच्या घरात आहे. सर्व मुले शनिवार-रविवार नियमित मोठ्या आनंदाने बालसंस्कार केंद्रात जमतात. देश-विदेशातही बालसंस्कार केंद्रे आहेत. या बालसंस्कार केंद्रात मुलांना आई-वडील, गुरुजन, ऋषी आणि त्यांची परंपरा, यांच्याबद्दल आदर आणि प्रेम निर्माण करणाऱ्या भावप्रधान गोष्टी सांगितल्या जातात. मुलांतील वीरता जागृत होईल, अशा शौर्यप्रधान गोष्टी सांगितल्या जातात. गुणग्राहकता, कृतज्ञता, अस्मिता व तेजस्विता यावी; शिस्त विनय आणि उद्यमशीलता समजावी; म्हणून रामायण, महाभारत, उपनिषदे यामधील गोष्टी सांगितल्या जातात. या गोष्टींद्वारे मुलांच्या मनात आपण एका भव्य, दिव्य संस्कृतीचे वारस आहोत हा गौरव निर्माण होतो. या बालसंस्कार केंद्रांची जबाबदारी आपले घर व ड्युटी सांभाळून गृहिणी मोठ्या निष्ठेने आणि प्रेमाने सांभाळीत आहेत.बालसंस्कार केंद्राच्या संचालकाची भूमिका कधीच शिक्षकाची नसते. भक्तीची असते. पुनःपुन्हा अभ्यास करण्याची भावना असते. ते स्वतःला समजलेले सांस्कृतिक विचार आणि गोष्टी मुलांना समजतील, अशा सोप्या भाषेत त्या सांगतात. या कृतीने स्वतःचे ज्ञान तपासतात. संचालिका आत्मलक्षी, बुद्धिनिष्ठ असते. निस्वार्थ आणि भगवद्परायण असते. संचालिका म्हणजे बालकांची वडील बहीण. त्यांनी बालकांकडून देवभाषेतील-संस्कृत भाषेतील श्लोक तोंडपाठ करून घ्यायचे असतात. बालकांचे चारित्र्य घडावे म्हणून भावप्रधान, शौर्यप्रधान गोष्टी तर सांगायच्याच; त्याशिवाय बालकांबरोबर खेळायचेही. मुलांना सांस्कृतिक मनोरंजनासाठी तयार करायचे. त्यांना सहलीला घेऊन जायचे. या सगळ्या कृतीतून बालकांचा व संचालकांचा अतूट संबंध जोडला जातो. आरोग्य बिघडते तेव्हा संचालिका स्वतःच्या नोकरी-धंधातून रजा घेते, परंतु बालसंस्कार केंद्राचा दिवस बुडू नये याची ती सतत काळजी वाहते. बालसंस्कार केंद्रावर तिचे इतके प्रेम असते.शनिवार-रविवार म्हणजे बालकांचा आणि महिलांचा सुटीचा दिवस, थकवा घालवण्याचा दिवस. सिनेमा-नाटक पाहाण्याचा, फिरायला जाण्याचा, आमोद-प्रमोदाचा दिवस. परंतु बालसंस्कार केंद्रात येणारी मुले आणि जबाबदारी सांभाळणाऱ्या संचालिका आपला शनिवार-रविवार संस्कृतीच्या कार्यात वापरतात. प्रभुकार्यात सहभागी होण्यात धन्यता मानतात. बरे यासाठी काही मानधन वगैरे मिळते का? तर नाही. बालसंस्कार केंद्राच्या संचालिकेच्या मनात कधी वेतनाचा विचार येत नाही. उलट, मुलांना प्रोत्साहन मिळावे, त्यांचा उत्साह वाढावा म्हणून त्यांना बक्षिसे देण्यासाठी स्वतःचा पैसा ही मंडळी खर्च करतात. बालसंस्कार केंद्रात येणारी मुले वेगवेगळ्या शाळेत शिकतात. ती जेव्हा आपापल्या शाळेत जातात तेव्हा त्यांची तेथील संस्कारी वर्तन आणि विनयी वाणीने त्यांच्या शिक्षकांचे प्रेम संपादन करतात. तसेच त्यांनी अभ्यासात पुढे राहावे यासाठी बालसंस्कार केंद्राचे संचालक-संचालिका दक्ष असतात.ही बालसंस्कार केंद्रे राष्ट्र उभारणीमध्ये पायाचे काम करीत आहेत. परंतु समाजाला याची आज जाणीव आहे का? हाही विचार करण्याजोगा प्रश्न आहे. आज समाजात स्वाध्ययाची उणीव आहे. स्वत:ला अक्कल नसते आणि कोणाजवळ बसून श्रवण करण्याची सद्बुध्दी होत नाही.आपला मुलगा वा मुलगी संस्कारी असावेत असे प्रत्येकाला वाटते, पण त्यासाठी आपण बदलायला तयार नसतो. आमच्या लेकराला बालसंस्कार केंद्रात घेऊन जा म्हणतात; पण स्वत: मात्र जागचे हलायला तयार होत नाहीत. बापाला रिल्स आणि आईला मालिका, सोशल मिडीया यातून बाहेर पडायला वेळच नाही. सण- उत्सवात नाचणे, मुरडणे, सजणे सर्वांना आवडते, पण त्यामागचा विचार, इतिहास परंपरा कोणालाही जाणून घ्यायची नाही. उद्याचे समृध्द राष्ट्र तुमच्या आमच्यासमोर खेळण्या-बागडणाऱ्या मुलांच्या रूपात असते. आजची आमची मुले म्हणजे वीस वर्षानंतरचा भारत देश आहे. याची जाणीव कितीजणांना आहे? बालकांना ज्या प्रकारचे पोषण आपण आज पुरवू त्यावरून उद्याच्या भारताचे सामर्थ्य ठरणार आहे. सकस आहाराच्या जागी जंक फूडस् आणि उत्तम विचारांच्या जागी उच्छृंखल व्हिडीओज याने जर आपण आपल्या पाल्यांचे पोषण करणार असू, तर उद्याचे नागरिक म्हणन त्यांचा दर्जा काय प्रकारचा असेल? पैलवान घडवायचा असेल, तर तो वेळ देऊन घडवाववा जातो. तो वेळ आणि कौशल्य सर्वच घरात असेल असे नाही, याला बालसंस्कार केंद्र हे सोपे उत्तर आहे. आपल्याला आजच जागे व्हावे लागेल. मुलांना बाल संस्कार केंद्राची गोडी लावावी लागेल. त्यासाठी सर्वप्रथम मातापित्यांना स्वाध्यायी व्हावे लागेल. तुकोबाराय म्हणतात,

अर्भकाचे साठी । पंतें हाती धरिली पाटी ।।
तैसे संत जगी । क्रिया करुनि दाविती अंगी ।।
बालकाचे चाली । माता जाणुनि पाऊल घाली
तुका म्हणे नाव । जनासाठी उदकीं ठाव ।।

विद्यार्थ्यांसाठी शिक्षक स्वतः हातात पाटी घेऊन त्यावर अक्षरे गिरवतात. तसेच माता देखील लहानग्याच्या चालीप्रमाणे हळुवार पाऊल टाकते. संत देखील तसेच असतात. सामान्य माणसांना समजावण्यासाठी, त्यांना मार्ग दाखवण्यासाठी स्वतः नियमाला धरून वागून दाखवतात. ज्याप्रमाणे नदी पार करण्यासाठी नाव स्वतः पाण्यात अखंड उभी असते. आता ती जबाबदारी पालक आणि समाज म्हणून आपली सर्वांची आहे. कधी उचलणार?

**रमेश वाघ**
नाशिक
मो. - ९९२१८१६१८३

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८०,विभागीय कार्यालयः सेक्टर नंबर ३२४, ई वॉर्ड, रिवोल्युशन, ऑफिस नंबर युजी ०७,स्टेशन रोड, करवीर, कोल्हापूर RNI NO.- 2023/90078,

# तुळजाभवानी मंदिर परिसरातील अतिक्रमण हटवा, धुम्रपान करणाऱ्यांवर कारवाई करा

**आरंभ मराठी | तुळजापूर**



महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई श्री तुळजाभवानी मंदिर परिसरातील स्वच्छता,शिस्त आणि भाविकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने तात्काळ पावले उचलण्याची मागणी शिवसेनेतर्फे करण्यात आली आहे. श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे व्यवस्थापक यांना तुळजापूर शहर शिवसेनेचे उपशहरप्रमुख रमेश चिवचिवे यांच्या वतीने निवेदन देण्यात आले असून,मंदिरासमोरील अतिक्रमण हटवणे आणि दर्शन मंडप व धर्मदर्शन हॉल परिसरात धूम्रपान करणाऱ्या पुजारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदनात म्हटले आहे की, मंदिराच्या महाद्वारासमोर दोरेवाले, बांगडेवाले आणि भिक्षुक यांचे अतिक्रमण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. ज्यामुळे भाविकांना दर्शनासाठी येताना म ोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागतो. या ठिकाणी भाविकांची चोरी, पाकीटमारीसारखे प्रकार वाढल्याने मंदिर परिसरातील पवित्रता आणि भाविकांचा विश्वास धोक्यात आला आहे. त्यामुळे या सर्व अतिक्रमणांवर तात्काळ कारवाई करून परिसर मोकळा करण्यात यावा,अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच, दर्शन मंडपामध्ये पेड पास काउंटर आणि धर्मदर्शन हॉल परिसरात काही पुजारी आणि कर्मचारी धूम्रपान करतात व थुंकतात. यामुळे मंदिर परिसरात अस्वच्छता निर्माण होते आणि भाविकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागतो. हे वर्तन अत्यंत गैरसोयीचे असून मंदिरासारख्या पवित्र ठिकाणी अशा प्रकारच्या कृतींना जागा नाही,असे शिवसेनेच्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शिवसेनेच्या या निवेदनात मंदिर संस्थान प्रशासनाने तात्काळ पावले उचलून संबंधितांवर कठोर कारवाई करावी,तसेच मंदिर परिसरात ''स्वच्छता व शिस्त राखा'' अभियान हाती घ्यावे,अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनावर तुळजापूर शहर शिवसेना उपशहरप्रमुख रमेश चिवचिवे, संजय लोंढे, संभाजी नेपते, बबलू कदम यांच्या स्वाक्षरी आहेत.

# नारंगवाडीची वाडी येथे हरिनाम सप्ताहला शिवसेना नेते ज्ञानराज चौगुले यांची सदिच्छा भेट




**आरंभ मराठी | नारंगवाडी**

नारंगवाडी येथील नारंगवाडीची वाडी येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहानिमित्त शिवसेना उपनेते तथा माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांनी सदिच्छा भेट देऊन उपस्थित भाविकांच्या उत्साहात भर घातली. सप्ताह मंडळाच्या वतीने व ग्रामस्थांच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले.सप्ताहाच्या धार्मिक कार्यक्रमाचा आढावा घेतल्यानंतर चौगुले यांनी ग्रामस्थांशी संवाद साधत समाजातील एकोपा आणि संस्कृती जपण्याचे महत्व अधोरेखित केले. दरम्यान, कमलाकर जाधव यांच्या घरी आयोजित सप्ताहाच्या भोजन पंगतीत सहभागी होत त्यांनी सामुदायिक जेवणाचा आनंद घेतला. त्यांच्या या साधेपणाच्या उपक्रमाचे ग्रामस्थांनी कौतुक केले. या वेळी नारंगवाडीचे सरपंच शेखर घंटे, ग्राम पंचायत सदस्य संजय पवार, चंद्रकांत मुळे, अमोल सुरवसे, कमलाकर जाधव, सुभाष सूर्यवंशी यांच्यासह कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

# तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात बी.टेक. प्रथम वर्षाचा पालक मेळावा उत्साहात

**आरंभ मराठी | धाराशिव**



तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात शुक्रवारी (दि.१७) बी.टेक. प्रथम वर्ष या वर्गाचा पालकमेळावा दूरस्थ प्रणालीद्वारे (ऑनलाइन) उत्साहात संपन्न झाला. या पालकमेळाव्याचा उद्देश विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबरोबरच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालक व महाविद्यालय यांच्यातील संवाद वाढविणे हा होता. कार्यक्रमाची सुरुवात स्वागत व परिचयाने झाली. यानंतर प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने यांनी पालकांना संबोधित करताना महाविद्यालयाचे शिक्षणाबरोबरच व्यक्तिम त्त्व विकास, उद्योगाभिमुख प्रशिक्षण आणि नवोन्मेषी उपक्रम राबविण्याबाबतचे प्रयत्न स्पष्ट केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी हे महाविद्यालय कटिबद्ध असून पालकांचा सहभाग तितकाच महत्त्वाचा असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. डिपार्टमेंट ऑफ बेसिक सायन्स अँड ह्युमॅनिटीजच्या विभागप्रमुख डॉ. उषा वडणे यांनी विभागात आयोजित विविध शैक्षणिक व सहशैक्षणिक कार्यक्रमांची सविस्तर माहिती पालकांना पीपीटीच्या माध्यमातून दिली. यामध्ये विद्यार्थ्यांच्या मूलभूत शैक्षणिक पायाभरणीसाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती देण्यात आली. या बैठकीत भविष्यातील शैक्षणिक योजना, महाविद्यालयातील विविध कार्यक्रम, तसेच विद्यार्थ्यांच्या शिस्त, उपस्थिती आणि कार्यक्षमतेबाबत पालकांसोबत चर्चा करण्यात आली. काही पालकांनी केलेल्या सूचनांचे महाविद्यालयाकडून स्वागत करण्यात आले. पालकमेळावा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी प्रा. बी. एस. चव्हाण, प्रा. डी. डी. मुंडे, प्रा. मनोज जोशी, डॉ. आर. एस. यादव आणि प्रा. वर्षा पाटील यांनी सहकार्य केले. या मेळाव्यामुळे पालक, विद्यार्थी आणि महाविद्यालय यांच्यात सुसंवादाचा सेतू अधिक मजबूत झाला.

# तुळजाभवानी इंटक युनियनतर्फे भाजपा तालुका अध्यक्षांचा सत्कार



**आरंभ मराठी | तुळजापूर**

श्री तुळजाभवानी सहकारी साखर कारखाना इंटक युनियनतर्फे भाजपचे तालुकाध्यक्ष महादेव जाधव, माजी जिल्हा परिषद सदस्य राजकुमार पाटील, व भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष विक्रम देशमुख यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी इंटक युनियनचे अध्यक्ष साहेबराव भिसे, उपाध्यक्ष नारायण शिंदे, सदस्य बापूसाहेब गाटे, अरुण पाटील यांच्या हस्ते हा सत्कार करण्यात आला.

# प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेतून दिगंबर बाबर यांच्या पत्नीला २ लाख रुपयांचा धनादेश प्रदान



**आरंभ मराठी | नळदुर्ग**

नळदुर्ग येथील स्टेट बँक ऑफ इंडियाचे ग्राहक दिगंबर अर्जुन बाबर यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी आशा दिगंबर बाबर (रा. गुळहळ्ळी, ता. तुळजापूर) यांना प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेअंतर्गत २ लाख रुपयांचा धनादेश प्रदान करण्यात आला. बँकेचे व्यवस्थापक कल्पेश घोडके यांच्या हस्ते हा धनादेश देण्यात आला. यावेळी सेवा प्रबंधक प्रविण साठवणे, सहाय्यक उत्कर्ष धोटे व दत्ता निकम उपस्थित होते. दिगंबर बाबर यांचे १३ फेब्रुवारी २०२३ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले होते. त्यांनी स्टेट बँक ऑफ इंडियामार्फत प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना घेतली होती. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबाला या योजनेचा लाभ मिळाला. यावेळी बँकेचे व्यवस्थापक कल्पेश घोडके म्हणाले, ''ग्राहकांसाठी बँकेमार्फत प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना व प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना राबविण्यात येतात. ग्राहकांनी या योजनांचा लाभ घ्यावा. तसेच एसबीआयच्या ग्राहकांसाठी वार्षिक फक्त २ हजार रुपयांत अपघात मृत्यूसाठी ४० लाख रुपयांपर्यंत विमा कव्हर दिले जाते, त्याचाही लाभ सर्व खातेदारांनी घ्यावा,'' असे आवाहन त्यांनी केले.

# पारा येथे वाचन प्रेरणा दिन विविध उपक्रमांनी साजरा





**आरंभ मराठी | पारा**

पारा येथील जय भवानी विद्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाची सुरुवात भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांची प्रतिमा पूजन करून झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी आवडत्या पुस्तकांचे वाचन, पुस्तक परिक्षण सादरीकरण, वाचन स्पर्धा आणि 'माझे आवडते पुस्तक' या विषयावर भाषण अशी उपक्रमांची रेलचेल पाहायला मिळाली. मुख्याध्यापक नवनाथ बाबासाहेब सूर्यवंशी यांनी वाचनाचे महत्त्व पटवून देताना सांगितले की, ''वाचन हीच ज्ञानाची गुरुकिल्ली असून दररोज थोडे वाचन केल्यास व्यक्तिमत्त्व अधिक समृद्ध होते.'' या कार्यक्रमात शिक्षकवृंद, पालक समिती सदस्य व विद्यार्थ्यांची उत्साही उपस्थिती होती.तसेच कळंब येथे रोटरी क्लब यांच्या आयोजनाने संपन्न झालेल्या बुद्धिबळ स्पर्धेमध्ये ज्येष्ठ नागरिक गटातील द्वितीय क्रमांक प्राप्त केल्याबद्दल श्री बाबुराव शेळके सर (सेवानिवृत्त शिक्षक) यांचे प्रशालेच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. कार्यक्रमाचे संयोजन जय भवानी विद्यालयातील सांस्कृतिक विभागाने केले व याप्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपक मुळे यांनी केले व संदीप भराटे , श्रीमती शितल मेटे, सतीश वाघमारे, दीपक मुरकुटे, विकास माळी, अमोल बांगर, शहाजी सोलंकर, अमोल गवळी यांनी सहकार्य केले.

# तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रा. अनिरुद्ध देशपांडे यांना मिळाला इन्फोसिसतर्फे पुरस्कार

**आरंभ मराठी | धाराशिव**

तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांसाठी इन्फोसिस या जगप्रसिद्ध आयटी कंपनीचे विविध सॉफ्टवेअर कोर्से, इंटर्नशिप, प्रगती पाथ टू फ्युचर अशा विविध प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येते. इन्फोसिस कंपनीच्या या विविध उपक्रमांची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी संस्थेतील माहितीचे समन्वयक (एसपीओसी – सिंगल पॉईंट ऑफ कॉंटॅक्ट) म्हणून प्रा.अनिरुद्ध देशपांडे हे काम पाहतात. प्रा.अनिरुद्ध देशपांडे यांना कंपनीतर्फे इन्फोसिस स्प्रिंगबोर्ड ''एसपीओसी ऑफ द मंथ'' या देशपातळीवरील पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. वर्ष २०२१ पासून इंटर्नशिपचे आयोजन, डेली डोस ऑफ नौलेज व पुणे येथील हिंजवडी येथे इन्फोसिस कंपनीचे प्रशिक्षणाचे आयोजन केले जाते. मागील ०४ वर्षात हजारो विद्यार्थ्यांनी इन्फोसिसचे मशीन लर्निंग, एब्लुएस, क्लाऊड कम्प्युटिंग, पायथन प्रोग्रामिंग अशा विविध अद्ययावत टेक्नोलोंजीचे सर्टीफाकेशन्स पूर्ण केले आहेत. विद्यार्थी इन्फोसिस कंपनीच्या तज्ञांसमवेत डिग्री पूर्ण होण्याच्या आधीच शिकत असताना विविध प्रोजेक्ट्स वर काम करत आहेत. महिला विद्यार्थ्यांना आयटी क्षेत्रात आपले स्थान मिळवण्यासाठी योग्य ती दिशा देण्याचे काम प्रगती टू फ्युचर या उपक्रमामार्फत होते. या सर्व उपक्रमात अनिरुद्ध देशपांडे यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळते. या कामाची दखल घेऊन कंपनीमार्फत पुरस्कार देण्यात आला आहे.संस्थेचे प्राचार्य डॉ.विक्रमसिंह माने यांनी पुढील काळात आजुन जास्त विद्यार्थी या उपक्रमांचा लाभ घेतील हा विश्वास दर्शविला .पुरस्कार मिळाल्याबद्दल



संस्थेचे अध्यक्ष डॉ.पद्मसिंह पाटील, आ.राणाजगजितसिंह पाटील, विश्वस्त मल्हार पाटील, सर्व विश्वस्त, संस्थेचे समन्वयक प्रा.गणेश भातलवंडे ,प्राचार्य.व्ही.व्ही.माने ,विभागप्रमुख आणि प्राध्यापकांनी अभिनंदन केले.

## आरंभ मराठी शेतकऱ्यांच्या विकासासाठी सर्व सहकार्य करणार: मकरंदराजे निंबाळकर

# निमजाई न्यूएरा शुगरचे बॉयलर अग्निप्रदीपन उत्साहात






**आरंभ मराठी | बार्शी**

(ता. बार्शी) येथे निमजाई न्यूएरा प्रायव्हेट लिमिटेड या कारखान्याच्या २०२५–२६ गळीत हंगामाचा बॉयलर अग्निप्रदीपन सोहळा अत्यंत उत्साहात व थाटात पार पडला. या सोहळ्याचे उद्घाटन ह. भ. प. विवेकानंद भाऊसाहेब बोधले महाराज (धामणगाव) यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या प्रसंगी बोलताना कारखान्याचे मकरंदराजे निंबाळकर म्हणाले, कारखान्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांना शक्य ते सर्व सहकार्य देत त्यांच्या विकासासाठी प्रयत्नशील राहू. शेतकऱ्यांशी नाळ जोडून ठेवणे हेच आमचे प्राथमिक उद्दिष्ट आहे.कारखान्याच्या यशस्वी संचालनासाठी सर्व ग्रामस्थ आणि शेतकऱ्यांचे सहकार्य महत्त्वाचे आहे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. सोहळ्यास माजी न्यायमूर्ती व माजी लोकआयुक्त पुरुषोत्तम गायकवाड, आमदार कैलास पाटील, नानासाहेब पाटील (माजी नगराध्यक्ष धाराशिव), नानासाहेब पाटील (चेअरमन, एनव्हीपी शुगर), आप्पासाहेब पाटील, भास्कर बेद्रे गुरुजी, चांगदेव माने (माजी संचालक, भोगावती कारखाना), आशिष मोदानी (संचालक, जनता सहकारी बँक), चित्राव गोरे, विक्रम सिंह व संजय देशमुख, मकरंद निंबाळकर (माजी सभापती, जि.प. सोलापूर), धीरजभैय्या पाटील (जिल्हाध्यक्ष, कॉंग्रेस) यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच कारखाना कार्यक्षेत्रातील शेतकरी, ग्रामस्थ, कर्मचारीवर्ग, उद्योगपती, प्रतिष्ठित नागरिक आणि हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाऊसाहेब बिराजदार बँकेकडून लाभांश वाटप, कारखान्याकडून साखर वाटून केली दिवाळी गोड

**आरंभ मराठी | उमरगा**

उमरगा येथील भाऊसाहेब बिराजदार अर्बन को–ऑपरेटिव बँकेच्या वतीने सन २०२४ –२५ सालाचा १० टक्के लाभांश बँकेच्या सभासदांना देण्याचा निर्णय घेतला. अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात झालेल्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर हा लाभांश देण्याचा निर्णय चेअरमन प्रा सुरेश बिराजदार यांनी जाहीर केला होता. तसेच भाऊसाहेब बिराजदार सहकारी साखर कारखान्याच्या वतीने कारखान्याच्या सभासदांना दिनांक १७ ऑक्टोबर पासून साखर वितरण करणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. दीपावली व पाडव्याच्या निमित्ताने सर्व शेतकरी सभासदांची दिवाळी गोड करणार असल्याचे चेअरमन सुरेश बिराजदार यांनी यावेळी जाहीर केले. धाराशिव जिल्हा तसेच उमरगा लोहारा तालुक्यातील शेतकरी अतिवृष्टीमुळे अत्यंत अडचणीत सापडला असल्याने भाऊसाहेब बिराजदार अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकेच्या सर्वसाधारण सभेत चेअरमन प्रा सुरेश बिराजदार यांनी सभासदांना १०% लाभांश देण्याचे जाहीर केले होते. त्याप्रमाणे भाऊसाहेब बिराजदार बँकेच्या सर्व सभासदांचे लाभांश त्यांच्या खात्यावर जमा होत आहेत. भाऊसाहेब बिराजदार बँकेत ज्यांचे खाते नाही त्यांनी खाते काढून घ्यावे. ज्यांची



केवायसी झालेली नाही अशांनी कागदपत्रांची पूर्तता करून खाते चालू करून घ्यावेत. असे आवाहन बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश शहापुरे यांनी सभासदांना केले आहे. तसेच कारखान्याच्या सर्वसाधारण सभेत सर्व शेतकरी सभासदांना सवलतीच्या दरात साखर वितरण करणार असल्याचे जाहीर केले होते. त्याप्रमाणे १७ ऑक्टोबरपासून या साखर वाटपाचा शुभारंभ समुद्राळ येथील कारखान्यावर करण्यात आला. सोमवार पर्यंत ही साखर वितरित होणार असल्याची माहिती कारखाना व्यवस्थापनाने दिली आहे. यामुळे भाऊसाहेब बिराजदार बँक व भाऊसाहेब बिराजदार कारखान्याच्या सर्व सभासदांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

# तुळजापूर शहरातील पाच हजार कुटुंबीयांची दिवाळी गोड

## विनोद गंगणे यांच्याकडून नागरिकांना दिवाळी किराणा किटचे वाटप






आरंभ मराठी | तुळजापूर

आनंदाचा उत्सव असलेल्या दीपावलीच्या सणानिमित्त तुळजापूर शहरातील ५००० गोरगरीब कुटुंबीयांना युवा नेते विनोद गंगणे व गंगणे कुटुंबीयांच्या वतीने शनिवारी (दि.१८) किराणा किटचे वाटप करण्यात आले. शहरातील हडको मैदान येथे हजारो लोकांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. तुळजाभवानी मातेचे मुख्य महंत तुकोजी बुवा, भाजपा जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, नितीन काळे, सुनील चव्हाण यांच्या हस्ते तुळजापूर शहरातील नागरिकांना किटचे वाटप करण्यात आले. तुळजापूर नगरीचे माजी नगरसेवक विनोद गंगणे यांच्या वतीने दरवर्षी दिवाळीनिमित्त नागरिकांना ही भेट देण्यात येते. यावर्षीचे हे सोळावे वर्षे असून गोरगरीब कष्टकरी लोकांची दिवाळी गोड व्हावी या हेतूने विनोद गंगणे व गंगणे कुटुंबियांकडून दरवर्षी विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. यावर्षी देखील ५००० किराणा किट सोबत गोरगरीब घरातील १००० लहान लहान मुलांना नवीन कपडे व फटाके विनोद गंगणे यांच्या वतीने भेट स्वरूपात देण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष सचिन रोचकरी, माजी नगराध्यक्ष अर्चनाताई गंगणे, मा. सभापती विजय गंगणे, प्रियंका गंगणे संगीता कदम, सज्जन सांळुके, आनंद कंदले, विशाल रोचकरी, निता क्षिरसागर, प्रिया गंगणे, पूजा गंगणे, भारतीताई गवळी दिनेश क्षिरसागर धैर्यशील दरेकर अमर हंगरगेकर रोहित चव्हाण समर्थ पैलवान यांच्यासह भाजपचे पदाधिकारी कार्यकर्ते नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमासाठी भाजपा कार्यकर्ते, विनोद गंगणे मित्र मंडळ व विजय सर गंगणे मित्र मंडळाच्या पदाधिकारी कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले.

### वृत्तपत्र विक्रेत्यांचा सन्मान

यावेळी माजी सभापती विजय सर गंगणे मित्र मंडळाच्या वतीने वृत्तपत्र विक्रेत्यांचा सन्मान करण्यात आला. वर्षातील बारा महिने थंडी, वारा, पाऊस यामध्ये सेवा देणाऱ्या वृत्तपत्र विक्रेत्यांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. अकबर शेख, गणेश भातुसे, दिलीप जळके, सुरज बागल, संतोष गायकवाड, गणेश गायकवाड, पिंटू सराफ, दादा नन्नवरे आदी वृत्तपत्र विक्रेत्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

### महिलांसह हजारो नागरिकांची उपस्थिती

या कार्यक्रमासाठी शहरातील महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. आगामी नगर परिषद निवडणूकीत नगराध्यक्ष पदासाठी विनोद गंगणे हे भाजपाकडून इच्छूक असून भाजपाकडून त्यांची उमेदवारी पक्की मानली जात आहे.

### आमदार राणा पाटील यांचा फोनवरून संवाद

माजी मंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांची तब्येत खराब असल्यामुळे त्यांचे पूत्र आमदार राणा पाटील यांना या कार्यक्रमाला उपस्थित राहता आले नाही. परंतु, त्यांनी फोन करून कार्यक्रमात उपस्थिती दर्शवली. अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात सर्वत्र मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे या काळात एकमेकांना साथ देणे गरजेचे असून विनोद गंगणे यांचा हा उपक्रम खूप चांगला व अभिमानास्पद असल्याचे आमदार राणा पाटील यांनी यावेळी सांगितले.

# जिजाऊ चौक ते बोंबले हनुमान चौक मार्गाची तातडीने दुरुस्ती करा

## भाजपची मागणी,जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव शहरातील जिजाऊ चौक, बार्शी नाका ते बोंबले हनुमान चौक हा मार्ग शहरातील अत्यंत महत्वाचा आणि वर्दळीचा असून, गेल्या काही वर्षांपासून या रस्त्यावर प्रचंड खड्डे पडल्याने नागरिकांचे हाल सुरू आहेत. रस्त्याची दुरवस्था नागरिक, विद्यार्थी, व्यापारी आणि वाहनधारकांसाठी मोठी डोकेदुखी ठरत आहे. या मार्गावरील खड्डे, वाहतुकीतील अडथळे आणि अस्वच्छतेमुळे नागरिक त्रस्त झाले असून या मार्गाची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, या मार्गावरून दररोज हजारो नागरिक, शालेय विद्यार्थी, दुकानदार तसेच व्यापारी वर्ग प्रवास करतो. मात्र गेल्या काही महिन्यांपासून रस्त्याची अवस्था अतिशय दयनीय झाली आहे. रस्त्यावरील खड्ड्यांमुळे अपघातांची मालिका सुरू आहे. पावसाळ्यानंतर रस्त्यावरील डांबर पूर्णपणे निघून गेल्याने मोठे खड्डे पडले आहेत. या भागात शाळा, व्यापारी प्रतिष्ठानं आणि रहिवासी वस्त्या असल्याने नागरिकांना दररोजच्या वाहतुकीत अडथळ्यांचा सामना करावा लागत आहे.निवेदनावर भाजपचे शहर सरचिटणीस अभिजित पतंगे, उमेश चव्हाण यांच्या स्वाक्षरी आहेत.

# मोटारसायकल व कारचा भीषण अपघात





आरंभ मराठी | उमरगा

उमरगा बायपास रोडवर अत्तार पेट्रोल पंपासमोर कार व मोटरसायकलची समोरासमोर धडक झाल्याची घटना शनिवारी (दि.१८) सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास घडली. उमरगा बायपास रोडवर मोटारसायकल (क्रमांक १४ ७७३६) व कार (क्रमांक २३ ३५६६) यांची समोरासमोर धडक होऊन मोटारसायकल चालक मोहन बाबुराव कुंभार (वय ५५, राहणार कदमापुर ता. उमरगा) हे जखमी झाले. सदर अपघाताची माहिती मिळताच उमरगा चौरस्ता येथील जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राच्यार्यजी महाराज संस्थानची रुग्णवाहिका तातडीने घटनास्थळी दाखल झाली. अपघातातील जखमीला उपजिल्हा रुग्णालय उमरगा येथे दाखल केले असल्याची माहिती रुग्णवाहिका चालक शेषराव लवटे यांनी दिली.

# धाराशिवच्या बासरी संस्कार विद्यालयात बालकलाकारांचा सत्कार सोहळा संपन्न

आरंभ मराठी | धाराशिव



धाराशिव शहरातील महर्षि दधिची फाऊंडेशन संचलित बासरी संस्कार विद्यालयात दिनांक १७ ऑक्टोबर रोजी विद्यार्थ्यांचा गौरव पत्र वितरण सोहळा संपन्न झाला. तसेच उपशिक्षणाधिकारी अधिकारी श्री होळकर सर यांचाही पदोन्नतीबद्दल सत्कार करण्यात आला. धाराशिवमधील बासरी संस्कार विद्यालयच्या माध्यमातुन अगदी लहान लेकरांपासून ते वयोवृद्धांनासुद्धा बासरी प्रशिक्षण देण्याचे कार्य केले जाते. पहिल्यांदाच गेल्या दोन वर्षापासुन बासरी संस्कार विद्यालय धाराशिवकरांच्या सेवेत असून या विद्यालयाचे सर्व विद्यार्थी अनेक मंचावर अगदी कमी कालावधीत अधिक तयारीसह सादरीकरण करताना दिसत आहेत व सर्वत्र त्यांचे कौतुक होताना पाहायला मिळत आहे. तर याच बालकलाकारांचा गौरव सोहळा म्हणून क्लास मध्ये भव्य गौरवपत्र वितरण सोहळा संपन्न झाला. सर्व पालक आणि अतिथींनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सदरील कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून उपशिक्षणाधिकारी श्री होळकर सर, पशुसंवर्धन विभागातील अधिकारी डॉ टेकाळे सर, वरिष्ट कलाकार दानवे मॅडम, आर्ट ऑफ लिविंगचे श्री गाडेकर सर, महर्षि दधीची फाऊंडेशनचे अध्यक्ष श्री कुडाळ सर बासरी विद्यालयाचे संचालक जगदीश सुतार व सदस्य, सर्व विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

# राज्यस्तरीय विज्ञान गाणित ज्ञानशोध परिक्षेत समृद्धी हंसराज भोसले हिने पटकावले अकरावे स्थान

आरंभ मराठी | उमरगा

मिलीया कॉलेज बीड येथे ५ ऑक्टोबर २०२५ रोजी आयोजित केलेल्या १४ व्या राज्यस्तरीय ऑनलाईन भौतिकशास्त्र व गणित विषयज्ञान परिक्षेत तालुक्यातील श्री. छत्रपती शिवाजी महाविद्यालय येथील १० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. भौतिकशास्त्र आणि इलेक्ट्रानिक्स विभागातर्फे विद्यार्थ्यांना राज्यस्तरीय परिक्षेत सहभाग घेवून या परिक्षेचे महत्व सांगण्यात आले. अशा परिक्षा दिल्यामुळे आपल्या विषयज्ञानाची खोली कितपत आहे तसेच प्रत्येक प्रश्नाचे स्वरूप हे निश्चित कळून एक आपल्याकडे वेगळा अनुभव प्राप्त होत असल्यामुळे हाच अनुभव पुढील आयुष्यात यशस्वी होण्यासाठी उपयोगी ठरतो. महाविद्यालयातील १० विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग नोंदवला होता. त्यापैकी सर्वजण १० विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून कु. समृद्धी हंसराज भोसले ही विद्यार्थीनी राज्यात ११ व्या स्थानावर आली आहे. या परिक्षा दोन भागात पार पडल्या असून पहीला भाग हा ५० बहुपर्यायी प्रश्न आणि दुसरा भाग मौखिक विषयज्ञान असे स्वरूप होते. ही राज्यस्तरीय परिक्षा ऑनलाईन असल्यामुळे कांही तांत्रिक अडचणीचा सामना करावा लागला, तरी विद्यार्थ्यांनी आपल्या विषयावर बऱ्याच प्रश्नाची मांडणी आपल्या शब्दात व्यक्त केली. या परिक्षेसाठी महाविद्यालयातील परिक्षा संयोजक म्हणून प्रा. डॉ अतुल बिराजदार व प्रा. डॉ. प्रविण गायकवाड यांनी काम पाहिले. या यशाबद्दल भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अमोल मोरे व उपाध्यक्ष अश्लेष मोरे , प्राचार्य डॉ. संजय अस्वले, डॉ. विलास इंगळे, डॉ. पद्माकर पिटले, प्रा. भास्कर लबडे विभागप्रमुख भौतिकशास्त्र विभाग तसेच प्रा. डॉ. अशोक पद्मपल्ले प्रभारी प्राध्यापक यांनी सहभागी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन केले.

## आरंभ मराठी अनुदान वितरणाची गती वाढविण्याची शेतकरी नेते अनिल जगताप यांची मागणी

# जिल्ह्याला तीन शासन निर्णयातून ५२२ कोटी ५८ लाखांची मदत

आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव जिल्ह्यात शेतकऱ्यांना अतिवृष्टीचा प्रचंड तडाखा बसला असून, मोठ्या प्रमाणात शेती पिकाचे नुकसान झाले आहे. जमिनी खरवडून गेल्या आहेत, घरांची पडझड झाली असून, पशुधनही वाहून गेले आहे. रस्ते व पूल यांची दुर्दशा झाली असून महावितरणचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. राज्य शासनाने या बाबीचा विचार करून ऑगस्टमध्ये झालेल्या नुकसानीचा अहवाल राज्य शासनाकडे गेल्यानंतर २३ सप्टेंबरच्या शासन निर्णयात धाराशिव जिल्ह्यातील २ लाख ३४ हजार ९५५ शेतकऱ्यांना १८९ कोटी ६० लाख ६७ हजार रुपये जाहीर केले होते. त्यानंतर राज्य शासनाने १६ ऑक्टोबर रोजी जो शासन निर्णय काढला त्यात धाराशिव जिल्ह्यातील ४ लाख ४ हजार ६५६ शेतकऱ्यांना २९२ कोटी ४९ लाख रुपये नुकसान भरपाई जाहीर केली आहे. १७ ऑक्टोबर रोजी ज्यांच्या शेतजमिनीचे नुकसान झाले आहे किंवा जमिनी खरडून गेले आहेत अशा धाराशिव जिल्ह्यातील ३३ हजार २६३ शेतकऱ्यांना ४० कोटी ४८ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. याचा अर्थ धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अतिवृष्टीतून दिलासा मिळावा यासाठी आत्तापर्यंत काढलेल्या तीन शासन निर्णयातून ६ लाख ३९ हजार ६११ शेतकऱ्यांना ५२२ कोटी ५८ लाख रुपयांची मदत जाहीर केलेली आहे. मात्र अनुदान वितरण करण्याची गती खूप कमी असल्यामुळे शेतकऱ्यांना दिवाळीचा सण साजरा करताना तसेच आर्थिक गणित जमवताना तारेवरची कसरत करावी लागणार आहे. ज्या गतीने राज्य शासनाने शासन निर्णय जाहीर केले त्याच गतीने आता मदत देण्याची देखील आवश्यकता आहे. १६ ऑक्टोबर २०२५ च्या शासन निर्णयाद्वारे धाराशिव जिल्ह्यातील ४ लाख ४ हजार ६५६ शेतकऱ्यांना जी २९२ कोटी ४९ लाख रुपयांची मदत जाहीर केलेली आहे त्याचे तालुकानिहाय वितरण असे आहे.



### आणखी मदतीची अपेक्षा

राज्य शासनाने जाहीर केलेली ही मदत केवळ दोन हेक्टर च्या मर्यादित आहे. आणखी एक हेक्टर चे ८५०० तसेच रब्बी हंगामासाठी जाहीर केलेले प्रती हेक्टर १० हजार रुपये याप्रमाणे मिळणाऱ्या मदतीचा प्रस्ताव देखील राज्य शासनाकडे लवकरच जाणार असून ती मदत देखील शासन निर्णयानंतर शेतकरी बांधवांना वितरित करण्यात येणार आहे.

| तालुका | – | शेतकरी संख्या | – | मिळणारी मदत |
|---|---|---|---|---|
| धाराशिव | – | ४१,५७४ | – | ४० कोटी ५१ लाख |
| तुळजापूर | – | ७३३११ | – | ६७ कोटी ६० लाख |
| उमरगा | – | ६८३३१ | – | ६१ कोटी ४५ लाख |
| लोहारा | – | १०३५० | – | १० कोटी ६० लाख |
| भूम | – | ४९,२५० | – | २३ कोटी ११ लाख |
| परंडा | – | ७३,११७ | – | ७० कोटी ५७ लाख |
| कळंब | – | ५५,२८७ | – | ११ कोटी ८९ हजार |
| वाशी | – | ३३४३६ | – | ८ कोटी १२ लाख आठ |

### केवायसी पोर्टल तत्काळ सुरू करण्याची गरज

राज्य शासनाने अतिवृष्टीचा तडाखा बसलेल्या धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना, तीन शासन निर्णयातून आतापर्यंत ५२२ कोटी रुपयांची मदत जाहीर झालेली आहे. जाहीर केलेली मदत शेतकऱ्यांच्या खात्यावर लवकरात लवकर कशी वर्ग होईल हे राज्य शासनाने व जिल्हा प्रशासनाने पाहणे महत्त्वाचे आहे. जरी ॲग्रीस्टॅक द्वारे ही मदत पडणार असली तरी ॲग्रीस्टॅक न झालेल्या २०% शेतकऱ्यांना केवायसीद्वारेच ही मदत पडणार आहे. १ ऑक्टोबर पासून बंद असलेले केवायसी पोर्टल राज्य शासनाने तातडीने चालू करण्याची गरज आहे.



अनिल जगताप
शेतकरी नेते.

# राज्यातील ७५ बसस्थानकांवर मोफत वाचन कट्टा

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

आरंभ मराठी | मुंबई

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पंचाहत्तरीनिमित्त महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने एक आगळावेगळा, लोकाभिमुख आणि संस्कारमूल्ये जपणारा उपक्रम हाती घेतला आहे. राज्यातील प्रमुख ७५ एसटी बसस्थानकांवर मोफत वाचनालय उभारून ज्ञान, साहित्य आणि संस्कृतीचा दिवा जनतेसाठी प्रज्वलित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. एसटी महामंडळाच्या मुख्यालयात झालेल्या ३०९ व्या संचालक मंडळाच्या बैठकीत या निर्णयाची घोषणा परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केली. या बैठकीस परिवहन आयुक्त विवेक भीमनवार, तसेच उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर उपस्थित होते.मंत्री सरनाईक म्हणाले, खासदार श्रीकांत शिंदे आणि ज्येष्ठ नेते विनय सहस्त्रबुद्धे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम आकाराला आला आहे. मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून सर्वसामान्य नागरिकांसाठी 'मोफत खुले वाचनालय' उभारण्यात येणार आहे.या वाचनालयांमध्ये वि.स. खांडेकर, कुसुमाग्रज, पु.ल. देशपांडे, नामदेव ढसाळ, व.पु. काळे, विश्वास पाटील अशा नामवंत साहित्यिकांच्या कृती उपलब्ध असतील. तसेच एमपीएससी व यूपीएससी परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मौल्यवान संदर्भग्रंथ ठेवण्यात येणार आहेत.हा 'वाचन कट्टा' मराठी भाषेचा समृद्ध वारसा जपणारा ठरेल आणि समाजात वाचन संस्कृतीचा नवा सुवर्णप्रकाश पसरवेल, असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी केले.

### प्रवाशांसाठी अनमोल भेट

मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळवून देणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पंचाहत्तरी निमित्त आम्ही जनतेसाठी ज्ञानाची ही 'अनमोल भेट' देत आहोत. वाचन संस्कृती आणि मराठी साहित्याचा प्रचार हा आमचा लोकाभिमुख उपक्रम आहे.



प्रताप सरनाईक,
परिवहनमंत्री